# उत्सवपर्वाच्या पार्श्वभूमीवर फ्लिपकार्टची देशभरातील २ हजारांहून अधिक फॅशन दुकानांसमवेत भागिदारी

*३००हून अधिक शहरांमध्ये १००हून अधिक ब्रँड्सचे स्टोअर कलेक्शन उपलब्ध करून देणार*

**बंगळुरू, १५ ऑक्टोबर २०२० :** फ्लिपकार्ट या एतद्देशीय ई कॉमर्स बाजारपेठेने यंदाच्या उत्सवपर्वात आपल्या व्यासपीठावर २ हजार फॅशन दुकानांमधील वैविध्यपूर्ण उत्पादन श्रेणी ग्राहकांपर्यंत आणण्यासाठी १०० हून अधिक ब्रँड्ससमवेत भागिदारी केली आहे. ३००हून अधिक शहरांमध्ये पसरलेल्या या दुकानांमुळे या भागिदारीच्या माध्यमातून या ब्रँड्सना जवळच्या पिनकोड्सपर्यंत आपले रिटेल सिलेक्शन पोहोचवता येऊन ग्राहकांना अधिक निवडीला वाव देऊन फ्लिपकार्टच्या सुरक्षित आणि निर्जंतुकीकरण केलेल्या पुरवठा साखळीच्या माध्यमातून त्यांच्यापर्यंत प्रत्यक्ष वितरण करता येईल.

उत्सवपर्व समीप येऊन ठेपला असून देशभरातील अधिकाधिक ग्राहक खरेदीसाठी ई कॉमर्सला पसंती देत असताना या भागिदारीमुळे शेकडो ब्रँड्सना प्रत्यक्ष दुकानांच्या माध्यमातून त्यांच्या ग्राहकांशी जोडलेले राहाण्यास मदत मिळेल. फ्लिपकार्टच्या या पुढाकारामुळे फ्लिपकार्टच्या २५ कोटींहून अधिक आणि सातत्याने विस्तारणाऱ्या ग्राहकवर्गाला अधिक वैविध्यपूर्ण उत्पादनांच्या निवडीस वाव मिळून मेट्रो, द्वितीय श्रेणीतील शहरे व त्यापलिकडील शहरांमधील, आपल्या घरातील सुरक्षित वातावरणातून ऑनलाइन खरेदीला पसंती देणाऱ्या ग्राहकांच्या सतत बदलत्या गरजांची पूर्तता होण्यासही मदत होईल.

या रिटेल स्टोअर्सना ई कॉमर्समधील फायदेशीर गोष्टी आणि सक्षम पुरवठा साखळीचा लाभ व्हावा, यासाठी फ्लिपकार्ट आपले तंत्रज्ञान आणि ‘जिओ फेन्सिंग’ व ‘स्टोअर हॉपिंग’सारख्या अतिप्रगत साठा व्यवस्थापन यंत्रणेचा पुरेपूर वापर करत आहे. मेट्रोपलिकडील प्रदेश आणि शहरांपर्यंत ही व्यवस्था पोहोचत असल्यामुळे ग्राहक आणि ब्रँड्स या दोघांचीही गरज पूर्ण होते. गुलबर्गा आणि सितापूरमधील लिबर्टी स्टोअर्स, कोचीन, पणजी व कालिकतमधील पेपे स्टोअर्स, झिराखपूर आणि मोगा येथील रेमंड स्टोअर्स, जम्मूमधील ॲरो स्टोअर्स, जोधपूरमधील खादिम स्टोअर्स, दुर्गापूरमधील एथनिसिटी स्टोअर्स अशा प्रकारची असंख्य उदाहरणे आहेत. या भागिदारीमुळे मेट्रो शहरांमधील ग्राहकांना ताज्या फॅशन्सची जलद डिलिव्हरी मिळते, तर द्वितीय श्रेणी व त्यापुढील प्रदेशांमधील ग्राहकांना ताज्या फॅशन्समधून निवडीची संधी उपलब्ध होते.

यासंदर्भात **फ्लिपकार्ट फॅशनचे उपाध्यक्ष निशित गर्ग** म्हणाले, *“ग्राहक, ब्रँड्स आणि विक्रेते अशा तिघांचाही लाभ होईल अशा प्रकारचे एकत्रित प्रारूप हेच भविष्यातील खरेदीचे स्वरूप आहे. हाच दृष्टिकोन समोर ठेवून ताज्या फॅशन प्रवाहातील सर्वोत्तम उत्पादनांच्या शोधात असलेल्या, पण मर्यादित उपलब्धता असलेल्या तृतीय श्रेणी व त्यापलिकडील शहरांमधील ग्राहक, तसेच कमीत कमी वेळात ताज्या फॅशनची उपलब्धता हवी असलेले मेट्रो शहरांमधील ग्राहक यांच्यातील दरी मिटवण्याचे काम आम्ही करत आहोत.*

*या पुढाकाराच्या माध्यमातून निवडीला असलेला वाव आणि जलद डिलिव्हरी या दोन्हींच्या बाबतीत ग्राहकांना आनंद मिळवून देण्यात तंत्रज्ञान महत्वाची भूमिका बजावत आहे.”*

यंदाच्या उत्सवपर्वात व बिग बिलियन डेजच्या कालावधीत आघाडीचे ब्रँड्स आणि विक्रेत्यांसमवेतच्या भागिदारीतून फ्लिपकार्टच्या व्यासपीठावर फॅशनशी निगडित आजवरची सर्वाधिक उत्पादने ग्राहकांसाठी उपलब्ध असणार आहेत. १६ ऑक्टोबरपासून सुरू होणाऱ्या बिग बिलियन डेजमध्ये प्लस सदस्यांसाठी १५ ऑक्टोबर २०२० पासून खरेदीची संधी असेल.

**About Flipkart Group**

The Flipkart Group is one of India's leading digital commerce entities and includes group companies Flipkart, Myntra, and PhonePe. Started in 2007, Flipkart has enabled millions of consumers, sellers, merchants and small businesses to be a part of India's e-commerce revolution, with a registered customer base of over 250 million, offering over 150 million products across 80+ categories. Our efforts to democratize e-commerce in India, drive access and affordability, delight customers, create lakhs of jobs in the ecosystem and empower generations of entrepreneurs and MSMEs has inspired us to innovate on many industry firsts. The recent launch of Flipkart Wholesale, our new digital marketplace, is a testament to our commitment to accelerate the growth of kiranas and MSMEs in India. Flipkart is known for pioneering services such as Cash on Delivery, No Cost EMI and easy returns –customer-centric innovations that have made online shopping more accessible and affordable for millions of Indians. Together with Myntra, which holds a prominent position in the online fashion market, PhonePe, India's fastest growing digital payments platform, and now Flipkart Wholesale, the Flipkart Group will continue to steer the transformation of commerce in India through technology.

For more information, please write to media@flipkart.com